मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# आपल्याला निष्ठवंतांसाठी पर्मनंट दुकान थाटायचं आहे : राज ठाकरे

## मनसेचा 19 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा : चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात राज ठाकरे बोलत होते.



**पिंपरी | प्रतिनिधी**

आपण १९ वर्षात काय केलं? आज असंख्य पक्षांना प्रश्न पडला आहे. ह्यांना फक्त मतं मिळतात, ना कोणी आमदार ना कोणी खासदार तरी ह्यांचे कार्यकर्ते एकत्र कसे राहतात. आज राजकीय फेरीवाले फिरतायेत, या फुटपाथ वरून डोळा मारला की तो दुसऱ्या फुटपाथवर जातो. आपण असले फुटपाथ बांधणार नाही तर आपल्याला निष्ठवंतांसाठी पर्मनंट दुकान थाटायचं आहे असं मत महाराष्ट्र नव निर्माणसेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले. मनसेचा १९ वा वर्धापन दिन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना राज ठाकरे बोलत होते.

राज ठाकरे म्हणाले की, मी आज फार काही बोलणार नाही, आज शुभेच्छा देणार आहे. कारण गुढीपाडव्याला मुंबईत होणाऱ्या मेळाव्याला बोलणार आहे. आता गुढी पाडव्याला मी दांडपट्टा फिरवणार आहे, त्यामुळं मी आज कशाला चाकू अन् सुरे काढू. आज महाराष्ट्राचा चिखल झालाय, हे राजकारणी मतांसाठी एकमेकांची डोकी फोडायला लावत आहेत, आग लावत आहेत, मात्र हे जनसामान्यांच्या लक्षात का येत नाही? हा खरा प्रश्न आहे.

पक्षात आता आपल्या कामकाजाचा लेखाजोखा केला जाणार आहे. प्रत्येक पंधरा दिवसाला आढावा घेतला जाणार आहे. जर पदाधिकाऱ्याने कामचुकारपणा केल्याचं आढळलं तर मी पदावरून हकालपट्टी करणार आहे. मग त्याला ज्या फुटपाथवर जायचं आहे, त्या फुटपाथवर त्याने जावं.

काही दिवसांपूर्वी घेतलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीला अनेक जण गैरहजर होते, कुठं गेले तर प्रयागराजला गेले म्हणे. कशाला तर त्या गंगेत पाप धुवायला गेले. पण अशा पाण्यात, मला म्हटलं तुम्ही पाणी घ्या, मी म्हटलं हट, असलं पाणी, अरे त्यात काय-काय होतंय. आमचे बाळा नांदगावकर आले, राज साहेब हे बघा. मी म्हटलं अरे कशी झालीये ती गंगा नदी अस्वच्छता हा कळीचा मुद्दा आहे. आता तुम्ही श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक समजला पाहिजे.

पुढे ते म्हणाले, २१ जून हा सर्वात मोठा दिवस नाही. कारण महिला दिन सर्वात मोठा दिवस आहे. हा दिवस ८ मार्चला सुरु होतो अन् पुढच्या वर्षीच्या ७ मार्चला हा दिवस संपतो. इतका हा मोठा दिवस आहे, हे ज्याचं लग्न झालंय, त्यांना चांगलं ठाऊक आहे. मुळात जिजाऊंचा जन्म दिवस हा महिला दिन म्हणून साजरा व्हायला हवा असं ठाकरे शेवटी बोलताना म्हणाले.

# महापालिकेने उभारलेल्या चिंचवड येथील पाण्याच्या टाकीचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते लोकार्पण

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या 20 लाख लिटर पाण्याची टाकीमुळे या परिसरातील नागरिकांची सोय होणार आहे





**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड परिसरातील लोकप्रतिनिधी, तसेच नागरिकांची पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी सातत्याने मागणी होत होती, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या २० लाख लिटर पाण्याची टाकीमुळे या परिसरातील नागरिकांची सोय होणार आहे तसेच सर्वांना स्वच्छ पाणी मिळावे, पाणी पुरवठा नियोजनबद्ध व्हावा, यासाठी पुढील काळातही महापालिकेने अशाच पद्धतीने नियोजन करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने चिंचवड येथील जुन्या एल्प्रो कंपनीजवळ नव्याने उभारलेल्या २० लाख लिटरच्या पाण्याचे टाकीचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, माजी महापौर अपर्णा डोके, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सुर्यवंशी, माजी नगरसदस्य नामदेव ढाके, सचिन चिंचवडे, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, ॲड. मोरेश्वर शेडगे, विठ्ठल भोईर, माजी नगरसदस्या अश्विनी चिंचवडे माधुरी कुलकर्णी, कार्यकारी अभियंता विजय सोनवणे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उप अभियंता प्रविण धुमाळ यांच्यासह पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, विविध संस्थांचे सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले की, 'चिंचवड परिसरातील अनेक भागांतील पाणी पुरवठा सुरळित होण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या २० लाख लिटर पाण्याची टाकीची मदत होणार आहे. महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी हे नागरिकांना उत्तम सेवा मिळाव्यात, नियमित पाणी पुरवठा करता यावा, यासाठी काम करीत आहेत, पुढील काळात देखील त्यांनी वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पाणीपूरवठ्याचे नियोजन करावे असे मत व्यक्त केले तसेच जागतिक महिला दिनानिमित्त शहरातील महिला भगिनींना शुभेच्छाही दिल्या.

आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेच्या पाणीपूरवठा विभागातील साधना ठोंबरे आणि प्रिती कासार या कनिष्ठ अभियंत्यांचा तसेच टाकीचे बांधकाम करणारे बांधकाम व्यावसायिक जे.डी. खानदेशे यांचा सत्कार करण्यात आला.

उन्हाळा सुरू झाला असून याकाळात पाण्याची बचत करण्याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. चिंचवड येथील नव्याने उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीमुळे याभागातील सुदर्शननगर, तानाजी नगर, केशवनगर, श्रीधरनगर यासह चिंचवड गावातील पाणी पुरवठा सुरळित होण्यास अधिक मदत होणार आहे असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले तसेच त्यांनी शहरातील महिला भगिनींना जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारीअभियंता विजय सोनवणे यांनी, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार प्रविण धुमाळ यांनी मानले.

# नरेंद्र पावटेकर यांची पक्षातून हकलपट्टी, शरद पवार गटाची मोठी कारवाई

## तरुणांना रोजगार मेळावा यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून पुण्यातल्या पुणे महानगरपालिका मेट्रो स्थानकामधील मेट्रो ट्रॅकवर उतरुन आंदोलन करण्यात आल होते.

**पुणे | प्रतिनिधी**

तरुणांना रोजगार मेळावा यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून पुण्यातल्या पुणे महानगरपालिका मेट्रो स्थानकामधील मेट्रो ट्रॅकवर उतरून आंदोलन करण्यात आल होते. दरम्यान, पुणे पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना खाकी दाखवत ताब्यात घेतलं आहे. या घटनेनंतर मेट्रो रुळावर आंदोलन करून प्रशासनाला वेठीस धरणाऱ्या आंदोलकांची पक्षातून हाकलपट्टी केल्याची माहिती शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली आहे.

सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे हे सगळे कार्यकर्ते मेट्रो ट्रॅकवर उतरून आंदोलन करण्यात येत होते. त्यामुळं मेट्रो सेवा विस्कळीत झाली. यावेळी पोलीस उपायुक्त संदीप सिंग गिल आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला पण आंदोलक काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. अखेर त्यांनी खाकी दाखवत आंदोलन करणाऱ्यांना ताब्यात घेतलं.

सोलापूर जिल्ह्याला १२ महिने पाणी मिळावे यासाठी आवर्तन वाढवावे, पाणी वाटपाचे योग्य नियोजन करावे अशी मागणी माजी आमदार राम सातपुते यांनी केली.

बैठकीला पुणे, सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कसबा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते नरेंद्र पावटेकर यांनी दुपारी दोनच्या सुमारास महापालिका मेट्रो स्टेशनमध्ये कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. यावेळी त्यांच्या हातामध्ये पेट्रोलच्या बाटल्या होत्या. सोबत काही महिला कार्यकर्त्याही होत्या. त्यांनी थेट मेट्रो मार्गिकेवर (ट्रॅक) धाव घेत आंदोलन सुरु केले. मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. पोलीस उपायुक्त उपायुक्त संदीप सिंग गिल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावंत पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांना हात जोडून तब्बल तासभर विनंत्या केल्या. त्यांची समजूत काढून खाली उतरुण तोडगा काढू असेही सांगितले.

मात्र आंदोलक ऐकण्यास तयारीत नव्हते. एवढ्यात पावटेकर आणि एक तरुण मार्गिकेवरील कढड्यावर चढले. गिल यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना शिवीगाळ करण्यात आली. यामुळे त्यांनी पक्षाचे नेते प्रशांत जगताप यांना फोन लावून दिला. मात्र पावटेकर यांनी जगताप यांनाच शिवीगाळ करत ते आम्हाला पुढे येऊ देत नाही असते म्हणत बोलण्यास नकार दिला.

तेव्हा पावटेकर यांनी उपायुक्त गिल आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावंत यांच्याशी हुज्जत घातली. पोलिसांसोबत गैरवर्तण केले. त्यांच्या अंगावर पेट्रोल फेकले. यामुळे पोलीस पथकाने खाक्या दाखवला. गिल यांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलकांची गचांडी पकडत त्यांना मेट्रो स्थानकात सहकाऱ्यांच्या मदतीने ओढत आणले.



### कार्यकर्त्यांना पोलिसांनी दाखवली खाकी

» या घटनेनंतर आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पक्षाला विश्वासात न घेताच हे परस्पर आंदोलन करण्यात आलं होते. आंदोलकांनी पोलिसांवरही हात उचलल्याचा आंदोलकांवर आरोप आहे. त्यामुळं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष नरेंद्र पावटेकरांसह काही कार्यकर्त्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. अशी माहिती शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली आहे. त्यांनी व्हिडीओ शेअर करत पत्रकदेखील जारी केलं आहे.

### काय म्हटलं आहे पत्रकात?

» उपरोक्त विषयास अनुसरून, नरेंद्र पावटेकर हे कसबा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते आहेत, त्यांनी मागील तीन महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केलेला होता. प्रवेश घेतल्यानंतर त्यांनी पक्षाच्या कुठल्याच आंदोलनात व कार्यक्रमात सहभाग घेतलेला नाही.अशा परिस्थितीमध्ये आज त्यांनी पुणे मेट्रोच्या विरोधामध्ये आंदोलन केले आणि आंदोलन केल्यानंतर पोलिसांशी हुज्जत घालणे त्याचबरोबर एकूणच पुणेकरांची अडवणूक करणे या गोष्टी केल्या, निश्चितच या सर्व गोष्टी निषेधार्य आहेत. आजचे त्यांचे आंदोलन ही वैयक्तिक असून त्याचा पक्षाशी काही संबंध नाही, आणि एकूणच पुणेकरांची आडवणूक करणे आणि पोलीस अधिकाऱ्यांबरोबर हुज्जत घालणे या सर्व प्रकाराबाबत पक्षाचा काहीही संबंध नाही.त्यांच्या या सर्व गोष्टी विचारात घेता त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात येत आहे.असं पत्रकात जगताप यांनी म्हटलं आहे.

# ठेवींच्या व्याजावर महापालिका मालमाल, वर्षाला मिळतेय 200 कोटींचे व्याज

## महापालिकेकडून दरवर्षी शिल्लक राहिलेले पैसे प्रत्येक सहा महिन्यांसाठी बँकेत ठेवले जात आहेत, या ठेवी सुमारे चार हजार कोटींच्या घरात

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून दरवर्षी शिल्लक राहिलेले पैसे प्रत्येक सहा महिन्यांसाठी बँकेत ठेवले जात आहेत. या ठेवी सुमारे चार हजार कोटींच्या घरात गेल्या असून त्यातून महापालिकेस वर्षाला तब्बल २०० कोटींचे व्याज मिळत आहे.

करोनाच्या साथीत सलग दोन वर्षे महापालिकेच्या खर्चावर बंधने घालत केवळ आरोग्य सेवांसाठी खर्च करण्यात आल्याने महापालिकेच्या ठेवी मोठ्या प्रमाणात वाढल्या असून मिळणारी व्याजाची रक्कमही वाढली असल्याचे महापालिकेच्या अंदाजपत्रकातून समोर आले आहे. या, शिवाय, शासनाकडूनही आलेला निधी अनेक वेळा महापालिका लगेच खर्च करीत नसल्याने हा निधीही बँकेत ठेवला जात असल्याने त्यावरही महापालिकेस घसघशीत व्याज मिळत आहे.

पालिकेच्या वित्तीय खर्चावर मर्यादा आणण्यासाठी शासनाकडून आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वित्तीय समिती नेमण्यात आली. त्यामुळे केवळ आरोग्य विभागास खर्चाची मुभा होती तर इतर विभागांना केवळ ३३ टक्केच खर्च करण्याचे बंधन होते.

२०२४- २५ या आर्थिक वर्षात महापालिकेस २०१ कोटी ६३ लाखांचे व्याज मिळाले आहे. तर पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात ( २०२५-२६) मध्ये व्याजातून २३० कोटींचे व्याजाचे उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे.




### करोनाच्या काळात वाढल्या ठेवी

» करोना काळात मार्च २०२० पासून पुढील दोन वर्षे शहरातील विकासकामे ठप्प होती. पालिकेच्या वित्तीय खर्चावर मर्यादा आणण्यासाठी शासनाकडून आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वित्तीय समिती नेमण्यात आली. त्यामुळे केवळ आरोग्य विभागास खर्चाची मुभा होती तर इतर विभागांना केवळ ३३ टक्केच खर्च करण्याचे बंधन होते. या काळात पालिकेचे मिळकतकर, शासनाचे अनुदान, बांधकाम विकसन शुल्क यांचे उत्पन्न सुरू असल्याने महापालिकेकडे मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक होता. हा निधी पालिकेकडून बँकेत ठेवींमध्ये ठेवण्यात आला. त्यामुळे २०२०-२१ नंतर पालिकेच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झाली. २०२०-२१ मधे महापालिकेस ठेवींवरील् व्याजातून ८० कोटी ६१ लाखांचे उत्पन्न मिळत होते हे उत्पन्न २०२४-२५ पर्यंत तब्बल २०१ कोटी ६३ लाखांवर गेले आहे.

**वर्ष / ठेवींवर मिळालेले व्याज**

२०२०-२१ : ८० कोटी ६१ लाख
२०२१-२२ : ११९ कोटी १५ लाख
२०२३-२४ : १५९ कोटी ६० लाख
२०२४-२५ : २०१ कोटी ६३ लाख

# निगडी, रावेत, वाकड, नाशिक फाटामार्गे चाकण; मेट्रोचा नवा मार्ग

## नव्या मार्गामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा 75 टक्के भाग मेट्रोशी कनेक्ट होईल, असा अधिकाऱ्याकडून दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात दापोडी ते निगडी या मेट्रोमार्गानंतर दुसरा मार्ग करण्यात येत आहे. त्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून, तो लवकरच पिंपरी-चिंचवड महापालिकेस सादर केला जाईल. नवीन मेट्रो मार्ग निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापासून, रावेत, वाकड बायपास, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा यामार्गे तो चाकणपर्यंत असणार आहे. या नव्या मार्गामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा 75 टक्के भाग मेट्रोशी कनेक्ट होईल, असा दावा अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.



पुणे शहराच्या तुलनेत पिंपरी-चिंचवड शहराकडे नवीन मेट्रो मार्ग निर्माण करण्याबाबत शासनाची उदासीनता दिसून येत आहे. यासंदर्भात 'पुढारी'ने सातत्याने ठळक वृत्त प्रसिद्ध केले आहे. तीस लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या आणि झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरासाठी नवीन मेट्रो मार्गाची गरज असल्याचे विविध संघटना आणि संस्थांकडून सात्याने मागणी केली जात आहे. मात्र, त्याबाबत केंद्र, राज्य शासन तसेच, महापालिका प्रशासन गंभीर नसल्याने अनेक घटनांवरून समोर आले आहे.

आता पुणे ते नाशिक महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तयार करणार आहे. तो आठ पदरी 'एलिव्हेटेड कॉरिडॉर' असणार आहे. तो मार्ग नाशिक फाटा येथून सुरू होणार आहे. त्यामुळे मेट्रोचा आराखडा पुन्हा बदलला जाणार आहे. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाशी समन्वय साधून मेट्रोचा नव्याने सुधारित डीपीआर तयार करण्यात येणार आहे. अखेर, नागरिकांचा रेटा लक्षात घेऊन महापालिकेने निगडी ते चाकण असा नवीन मेट्रो मार्गाचा डीपीआरचा आराखडा तयार करण्यास महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (महामेट्रो) सांगितले आहे. त्यानुसार, महामेट्रोकडून आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. या मार्गाद्वारे शहराच्या दक्षिण भाग तसेच, भोसरीकडील भाग मेट्रोने जोडला जाणार आहे. वाकड आणि पिंपळे सौदागर हा उच्चभ्रू आणि आयटीचा परिसर मेट्रोने जोडला जाणार आहे. या संपूर्ण मार्गामुळे तसेच, निगडी ते दापोडी मार्गामुळे पिंपरी-चिंचवडचा 75 टक्के भाग मेट्रोशी जोडला जाईल, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.

महामेट्रोकडून आराखडा येत्या 4 ते 5 महिन्यांत तयार होण्याची शक्यता आहे. त्या डीपीआरला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तो मंजुरीसाठी राज्य व नंतर केंद्र शासनाकडे पाठविला जाईल. केंद्राने मान्यता दिल्यानंतर या नव्या मेट्रो मार्गाचे प्रत्यक्ष काम सुरू होईल. ही सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यास किमान दीड ते दोन वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### नाशिक फाटा ते चाकणच्या जुन्या डीपीआरमध्ये होणार बदल

**» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सूचनेवरून नाशिक फाटा ते चाकण या मार्गाचा महामेट्रोने दोन वेळा डीपीआर तयार केला. पहिल्यांदा निओ मेट्रोचा आराखडा तयार केला होता. त्यानंतर सुधारणा करून मेट्रोचा आराखडा तयार केला. आता पुणे ते नाशिक महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तयार करणार आहे. तो आठ पदरी 'एलिव्हेटेड कॉरिडॉर' असणार आहे. तो मार्ग नाशिक फाटा येथून सुरू होणार आहे. त्यामुळे मेट्रोचा आराखडा पुन्हा बदलला जाणार आहे. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाशी समन्वय साधून मेट्रोचा नव्याने सुधारित डीपीआर तयार करण्यात येणार आहे.**

### असा असेल नवीन मार्ग

**» निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक स्टेशन, रावेत, मुकाई चौक, पुणे-मुंबई-बंगळुरू महामार्ग, वाकड बायपास, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, भोसरी, मोशी, चाकण असा हा मार्ग आहे. या मार्गाचे अंदाजे 35 ते 40 किलोमीटर अंतर आहे.**

# इंद्रायणी नदीकाठाच्या सोसायट्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## आरोग्य विभागाचे दुर्लक्ष, जेथे वशिला तेथेच होते अगोदर औषध फवारणी, पालिकेच्या दुजाभावामुळे असंतोषात भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे इंद्रायणी नदी काठावरील शेकडो गृहप्रकल्पतील (सोसायट्या) सभासदांना वाढत्या मच्छरांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. त्याचा फटका या सोसायट्यामध्ये राहणाऱ्या हजारो नागरिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत आरोग्य विभागाला कल्पना देऊन ही ते दुर्लक्ष करीत आहेत.



ज्या सोसायटीला राजकीय वरदहस्त तेथे आरोग्य विभाग दक्षता घेत असल्याने या दुजाभावाची विरोधात रहिवाशांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. जर प्रत्यक नागरिक मनपाचा कर भरत असेल तर त्याला सोयी - सुविधा मिळणे गरजेचे आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. महापालिका आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे इंद्रायणी नदी काठावरील शेकडो गृहप्रकल्पतील सभासदांना वाढत्या मच्छरांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. मच्छरांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांचे आरोग्य ही धोक्यात येऊ लागल्याने नागरिकांच्यामध्ये असंतोष वाढला आहे.

इंद्रायणी काठी असणाऱ्या चऱ्होली, डुडुळगाव, मोशी, चिखली, तळवाडे या गावाचा समावेश आहे. याठिकाणी मोठ्याप्रमाणावर गृहप्रकल्प उभे राहत आहेत. पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात सर्वाधिक विकास कामे या भागात होत आहेत. त्यामुळे या भागाचे नागरीकरण मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. त्यामध्ये इंद्रायणीनदी काठावर असणाऱ्या जगावर ही शेकडो गृहप्रकल्प उभे राहिल्याने हजारोच्या संख्येने नागरिक याठिकाणी वास्तव्यास आले आहेत.

### कोट्यवधीचा खर्च आणि जलपर्णी वाहून जाण्यासाठी पावसाची वाट

**» महापालिका आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे इंद्रायणी नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर जलपर्णी वाढली आहे. जलपर्णी काढण्यासाठी कोट्यवधी रुपये प्रशासन खर्च करते. आणि संबंधित ठेकेदार हे जलपर्णी वाहून जाण्यासाठी पावसाळ्याची वाट पाहत बसतात अशी दबक्या आवाजात चर्चा आहे.**

### रिव्हर व्ह्यूव्ह फ्लॅट ठरत आहेत डोकेदुखी

**» नदीच्या काठी, मस्त नैसर्गिक वातावरणामध्ये आपले स्वतःचे घर अशा स्लोगनमुळे अनेकांनी रिव्हर व्हिव बघून चढ्या दराने घेतलेले फ्लॅट आता सोयी सुविधा मिळत नसल्यामुळे त्रासदायक ठरत असल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणी प्रश्न आवासून उभा राहिला आहे. त्यातच आता नदीमध्ये जलपर्णी वाढल्याने मच्छरांचे प्रमाण वाढल्याने विविध प्रश्न नव्याने निर्माण होत आहेत. त्यामुळे रिव्हर व्ह्यूव्ह बघून घेतलेले घर आता त्रासदायक होत असल्याच्या प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांच्यामध्ये व्यक्त होताना दिसत आहेत.**

# शाळांच्या वार्षिक परीक्षा लांबणीवर; शिक्षक व पालकांचा संताप

## राज्यभरातील सर्व शाळांच्या वार्षिक परीक्षेसाठी शिक्षण विभागाने वेळापत्रक प्रसिद्ध केले असून, यावर्षीच्या परीक्षा 25 एप्रिलपर्यंत असणार आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यभरातील सर्व शाळांच्या वार्षिक परीक्षेसाठी शिक्षण विभागाने वेळापत्रक प्रसिद्ध केले असून, यावर्षीच्या परीक्षा 25 एप्रिलपर्यंत असणार आहेत. त्यामुळे पालक व शिक्षकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, वार्षिक परीक्षेचे वेळापत्रक बदलण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने केल्याची माहिती शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी दिली.

राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने राज्यभरातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी वार्षिक परीक्षांमध्ये एकवाक्यता राहवी तसेच एप्रिलमध्ये मुलांची उपस्थिती राहण्यासाठी वार्षिक परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. एप्रिल अखेरपर्यंत या परीक्षा सुरू राहणार असल्याने या वेळापत्रकावर पालक व शिक्षकांनी आक्षेप घेतला आहे.



### परीक्षेनंतर शिक्षकांची कामे

» वार्षिक परीक्षेनंतर शिक्षकांना पेपर तपासणी, संकलित मूल्यमापन नोंदवही पूर्ण करणे, पॅट परीक्षेचे गुण ऑनलाइन चॅटबोटवर भरणे, निकाल पत्रकांना मंजुरी घेणे, यांसारखी कामे करावी लागतात. ती कधी करायची, असा सवाल शिक्षक उपस्थित करत आहेत.

दरवर्षी प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये संपत असतात. 15 एप्रिलपर्यंत परीक्षांचे कामकाज पूर्ण होऊन पुढील पंधरवड्यात वार्षिक निकालपत्रिक तयार करून 1 मे रोजी निकाल जाहीर केला जातो. मात्र, या वर्षी उशिरा होणाऱ्या परीक्षेमुळे शिक्षकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे.

> फेब्रुवारी महिन्यात शिक्षकांना अध्यापनासाठी वेळ देण्याऐवजी त्यांना महिनाभर प्रशिक्षण दिले गेले. आता ऐन उन्हाळ्यात एप्रिल महिन्यात विद्यार्थी-शिक्षकांना नियमित शिक्षणासाठी आग्रह करणे अजब आहे.
>
> \- बाळासाहेब मारणे, राज्याध्यक्ष, प्राथमिक शिक्षक संघ

वार्षिक परीक्षेसोबतच, संकलित मूल्यमापन 2, पॅट चाचणीचे आयोजन करण्याच्या सूचना आहेत. ही परीक्षा तिसरी ते नववीच्या वर्गांसाठी आहे. पॅट परीक्षा मराठी, इंग्रजी व गणित या विषयांसाठी घेतली जाते. त्याचबरोबर पाचवी ते आठवीच्या मुलांसाठी वार्षिक परीक्षा घेण्यात आली आहे.

शिक्षण आयुक्तालयाच्या परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा पार पाडल्यास शेवटचा पेपर 25 एप्रिल रोजी आहे. त्यानंतर निकालापर्यंत फक्त चार ते पाच दिवसांचा कालावधी उपलब्ध आहे. जास्त विद्यार्थिसंख्या असणाऱ्या शाळांमध्ये निकालाच्या कामासाठी खूप कमी कालावधी मिळत आहे. अशा परिस्थितीत 1 मे रोजी निकाल कसा जाहीर करणार, असा प्रश्न शिक्षकांपुढे आहे.

ऐन उन्हाळ्यात मुलांचे हाल15 एप्रिलनंतरचा प्रचंड उकाडा, बाहेरगावी जाणारे पालक, ग्रामीण भागातील यात्रांचा हंगाम यांमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठभ शिक्षकांची धावाधाव होणार आहे. यंदा उन्हाची तीव्रताही अधिक आहे. त्यामुळे अनेक मुले उष्णतेमुळे आजारी पडण्याच्या भीतीने पालकांनी या वेळापत्रकावर आक्षेप घेतला आहे.

# महसुली गावांना स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा द्या, अखिल भारतीय सरपंच परिषदेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील ग्रुप ग्रामपंचायती रद्द करून महसुली गावांना स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

राज्यातील ग्रामीण महाराष्ट्राच्या आणि गाव खेड्यांच्या विकासासाठी ग्रामपंचायत महत्त्वाची संस्था आहे, परंतु आजही अनेक ग्रामपंचायती, ग्रुप ग्रामपंचायती असल्याने राज्यातील गावांच्या विकासाला आळा बसला आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना, ग्रामीण महाराष्ट्र आणि गाव खेड्यांच्या विकासासाठी ग्रुप ग्रामपंचायती बरखास्त व्हाव्यात. ग्रुप ग्रामपंचायती असल्याने गावांचा सर्वांगीण विकास होत नाही.




### एकूण 40959 ग्रामपंचायती...

» राज्यातील एकूण गावांची संख्या ४०९५९, राज्यातील महसुली गावांची संख्या ३६५३७, राज्यातील एकूण ग्रामपंचायत संख्या २७९५१ असून, एकूण गावांपेक्षा १३००८ एवढ्या ग्रामपंचायती कमी आहेत, तर महसुली गावांपेक्षा ८५८६ एवढ्या ग्रामपंचायती कमी आहेत.

ग्रामीण भागातील विकासासाठी अशी कुठलीही यंत्रणा उभी केली जात नाही. शहरांच्या विकासासाठी लागणाऱ्या निधीपेक्षा कमी निधीमध्ये या ग्रामपंचायती स्वतंत्र होतील. त्यांचे स्वतःची ग्रामपंचायत कार्यालय होतील. या मागणीकडे लक्ष देऊन राज्य शासनाने लवकरात लवकर योग्य भूमिका न घेतल्यास तीव्र आंदोलन उभे केले जाईल, असा इशारा सरपंच परिषदेच्या वतीने शासनास देण्यात आला आहे.

ग्रामस्थांना ग्रामपंचायतीमध्ये येण्यासाठी अनेक किलोमीटर प्रवास करावा लागतो. एकाच भागात विकास केंद्रित होतो. ठराविक भागातील सरपंच व सदस्य सातत्याने निवडून येतात, अशा अनेक तक्रारींमुळे ग्रुप ग्रामपंचायती बरखास्त करून महसुली गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत दर्जा मिळावा, अशी मागणी सरपंच परिषदेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी केली आहे.

### अन्यथा तीव्र आंदोलन

» शहरांच्या विकासासाठी सीडको, एमएमआरडीएस, पीएमआरडीए, हुडको, प्राधिकरण अशा कंपन्या स्थापन केल्या जातात. त्यांच्यासाठी अब्जावधी रुपयांची तरतूद व निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र, ग्रामीण भागातील विकासासाठी अशी कुठलीही यंत्रणा उभी केली जात नाही. शहरांच्या विकासासाठी लागणाऱ्या निधीपेक्षा कमी निधीमध्ये या ग्रामपंचायती स्वतंत्र होतील. त्यांचे स्वतःची ग्रामपंचायत कार्यालय होतील. या मागणीकडे लक्ष देऊन राज्य शासनाने लवकरात लवकर योग्य भूमिका न घेतल्यास तीव्र आंदोलन उभे केले जाईल, असा इशारा सरपंच परिषदेच्या वतीने शासनास देण्यात आला आहे.